जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २२३ | सोमवार, ९ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## संक्षिप्त

### शेअर मार्केट आणि भिशीच्या नावाखाली चार कोटींची फसवणूक

**मुळशी, ता. ८ :** गुंतवणुकीवर भरघोस परताव्याचे आमिष दाखवून एका कुटुंबाने शेकडो गुंतवणूकदारांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना १५ मे २०२३ ते ७ मार्च २०२६ या कालावधीत मुळशी तालुक्यातील माण येथे घडली. याबाबत एका व्यक्तीने हिंजवडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार एका महिलेसह चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादी आणि इतर गुंतवणूकदारांना शेअर मार्केट तसेच भिशीमध्ये पैसे गुंतवण्यास भाग पाडले. दरमहा ४ ते ५ टक्के जास्तीचा परतावा देण्याचे आमिष दाखवून त्यांनी फिर्यादींचे ५७ लाख ६ हजार रुपये आणि इतर गुंतवणूकदारांचे ३ कोटी ५९ लाख १४ हजार ८९२ रुपये असे एकूण ४ कोटी १६ लाख २० हजार ८९२ रुपये जमा केले. कोणतीही रक्कम परत न करता गुंतवणूकदारांची फसवणूक केली असून हिंजवडी पोलीस तपास करत आहेत.

# हवेली पंचायत समितीच्या सभापती युवराज काकडे की कृषिराज चौधरी?

## सभापती-उपसभापती निवडीवर जिल्ह्यासह तालुक्याचे लक्ष

**लोणी काळभोर, ता. ७ :** हवेली पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदाची निवडणूक सोमवारी (ता. ०९) होत असून या महत्त्वाच्या पदांवर कोणाची वर्णी लागणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. या दोन महत्त्वाच्या पदांवर कोणाची वर्णी लागणार याकडे संपूर्ण जिल्ह्यासह हवेली तालुक्याचे लक्ष लागले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून इच्छुक उमेदवारांकडून जोरदार लॉबिंग आणि गाठीभेटी सुरू असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

महिनाभरापूर्वी झालेल्या हवेली पंचायत समितीच्या १२ जागांपैकी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) सर्वाधिक ६ जागांवर विजयी झाली. तर भाजपाने ४, शिवसेना शिंदे गटाने १ आणि १ जागा अपक्ष उमेदवाराने जिंकली. स्पष्ट बहुमतासाठी ७ आकडा आवश्यक




असताना कोणत्याही पक्षाला तो गाठता आला नव्हता. मात्र, लोणी काळभोर वडकी गणातून अपक्ष निवडून आलेल्या विद्या गायकवाड यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला पाठिंबा दिल्याने राष्ट्रवादीचे संख्याबळ ७ वर पोहोचले असून सत्तेचा मॅजिक फिगर राष्ट्रवादीने पार केल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सभापती व उपसभापती पदावर राष्ट्रवादीची पकड मजबूत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

हवेली पंचायत समितीचे सभापती पद सर्वसाधारण वर्गाकडे असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये थेऊर गणातील युवराज काकडे व कोरेगाव मूळ गणातील कृषिराज चौधरी या दोन उमेदवारांमध्ये चुरस निर्माण झाली असून या दोघांपैकी एकाच्या गळ्यात सभापतीपदाची माळ पडणार, असा राजकीय अंदाज व्यक्त केला जात आहे. तर, उपसभापती पदासाठीचे नाव अद्याप पक्ष नेतृत्वाने गुलदस्त्यात ठेवले आहे.

याच पार्श्वभूमीवर खानापूर गणाचे सदस्य युवराज नारायण वांजळे यांची गटनेतेपदी झालेली निवडही तालुक्यातील राजकारणात महत्त्वाची ठरली आहे. या घडामोडींमुळे पंचायत समितीच्या सत्ता समीकरणाला नवी कलाटणी मिळाली असून उद्याच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, एकूणच सभापतीपदाच्या निवडणुकीत प्रतिष्ठेची लढत रंगणार असून कोणाच्या गळ्यात सत्तेची माळ पडणार, याचा फैसला सोमवारी होणार आहे. त्यामुळे हवेली पंचायत समितीतील उद्याची विशेष सभा तालुक्याच्या राजकारणात निर्णायक ठरणार असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे.

### सभापतीपदासाठी जोरदार लॉबिंग

युवराज काकडे हे विकासकामांचा अनुभव आणि स्थानिक जनाधार यावर भर देत सभापतीपदासाठी जोरदार लॉबिंग करत आहेत. तर चौधरी यांनी संघटनात्मक ताकद आणि कार्यकर्त्यांच्या पाठबळावर आपला दावा मजबूत केल्याची चर्चा आहे. त्यामुळे राष्ट्रवादीतच मैत्रीपूर्ण स्पर्धा निर्माण झाली असून पडद्यामागील बैठका, फोनाफोनी आणि राजकीय गणिते वेगाने बदलताना दिसत आहेत.

### निवडणूक कार्यक्रम

- सकाळी ११.०० ते ११.३० : सभापती व उपसभापती पदासाठी नामनिर्देशन स्विकारणे.
- सकाळी ११.३१ ते १२.०० : विशेष सभेचे कामकाज सुरू करणे व नामनिर्देशनाची छाननी करणे.
- दुपारी १२.०१ ते १२.३० : नामनिर्देशन पत्र माघार घेणे.
- दुपारी १२.३१ पासुन पुढे : आवश्यक असल्यास मतदान घेऊन निकाल जाहीर करणे




### आभासी चलनात गुंतवणुकीच्या आमिषाने १२ लाखांची फसवणूक

**हडपसर, ता. ८ :** आभासी चलनात गुंतवणुकीच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी एकाची १२ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध हडपसर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एकाने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ५४ वर्षीय तक्रारदार हे हडपसर भागात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर एक लिंक पाठविली. आभासी चलनात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखवून चोरट्यांनी त्यांना जाळ्यात ओढले. त्यानंतर चोरट्यांच्या बँक खात्यात तक्रादाराने ऑनलाइन पद्धतीने वेळोवेळी १२ लाख ११ हजार रुपये जमा केले.

दरम्यान, पैसे जमा केल्यानंतर त्यांना परतावा देण्यात आला नाही. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक जगदाळे तपास करत आहेत.

# अहिल्यानगरमध्ये एक लाख ८० हजार लखपती दीदी होणार

**अहिल्यानगर, ता. ८ :** उमेद अभियानांतर्गत जिल्ह्यातील महिला बचत गटांना ७८ कोटी रुपयांचा समुदाय गुंतवणूक निधी वितरित करण्यात आला आहे तसेच जिल्ह्यात १ लाख ८० हजार लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून राज्यात सर्वाधिक लखपती दीदी तयार करण्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येणार आहे.

येत्या काळात महिलांना विविध व्यवसायांद्वारे उत्पन्नाची सुरुवात करून देण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध उपक्रम राबवण्यात येतील असे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी सांगितले.जागतिक महिला दिनाच्या औचित्य साधून महिला बचत गटांच्या खाद्यपदार्थांच्या उत्पादनांना चालना देण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा परिषद, जनसेवा फाउंडेशन (लोणी) यांच्यावतीने सावेडी उपनगरात खाद्यजत्रेचे आयोजन



करण्यात आले आहे.

या खाद्यजत्रेत राज्यातील जिल्ह्यातील महिला बचत गट सहभागी झाले होऊन त्यांनी स्टॉल उभारले आहेत. या खाद्यजत्रेला भेट दिल्यानंतर पालकमंत्री बोलत होतेयावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले, महिलांना स्वतःच्या पायावर उभे करत कुटुंबाचा भक्कम आधार बनवण्याचे काम महिला बचत गटाच्या माध्यमातून होत आहे. महिलांची ओळख एक यशस्वी उद्योजिका व्हावी म्हणून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. प्रास्ताविकात मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी सांगितले की, जिल्ह्यात सध्या ३० हजार बचत गटांच्या माध्यमातून ३ लाख ११ हजार महिला जोडल्या गेल्या आहेत. या गटांना आतापर्यंत ३५३ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले आहे. यावेळी पालकमंत्री विखे यांनी खाद्यजत्रेतील विविध स्टॉलला भेटी देत खाद्यपदार्थ, उत्पादनांची माहिती घेतली तसेच महिला बचत गटांनी केलेली तयार केलेल्या उत्पादनांची कौतुक केले.

महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, उमेदचे जिल्हा व्यवस्थापक सोमनाथ जगताप आदी उपस्थित होते. खाद्यजत्रेमध्ये अहिल्यानगरसह कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, कोल्हापूर, पुणे, सोलापूर, उत्तर महाराष्ट्रातील जळगाव, धुळे, नंदुरबार, विदर्भातील नागपूर, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, धाराशिव आदी जिल्ह्यातील बचतगटांनी शाकाहारी व मांसाहारी खाद्यपदार्थांचे स्टॉल लावून सहभागी झाले आहेत. शनिवार व रविवार या सुट्टीच्या दिवसां मुळे खाद्यजत्रेला नगरकरांनी चांगला प्रतिसाद दिला.

# माध्यमांवरील कॉर्पोरेट कंट्रोल कमी व्हावा; माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची मागणी

**सातारा, ता. ८ :** राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी माध्यमांवरील कॉर्पोरेट कंट्रोल कमी व्हावा, अशी मागणी केली आहे. ज्येष्ठ पत्रकार व राजकीय विश्लेषक जयंत माईणकर यांच्या कटाक्ष या लेखसंग्रहाचे लोकार्पण करताना चव्हाण बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी खासदार व ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश पोहरे, माजी न्यायमूर्ती द्वय सत्यरंजन धर्माधिकारी व साधना जाधव, सदामंगल प्रकाशनच्या प्रकाशक-संपादक प्रज्ञा जांभेकर आणि जयंत माईणकर उपस्थित होते.

चव्हाण म्हणाले, आज अंबानी, अदानी, सुभाषचंद्र यांच्याकडे किती चॅनेल्स आहेत याचा अभ्यास केला,



तर त्यांचा आवाका किती मोठा आहे हे लक्षात येईल. मीडियावरील हा कॉर्पोरेट कंट्रोल कमी झाला पाहिजे, त्यावर काही मर्यादा आल्या पाहिजेत. तसेच मीडियाच्या विविध भागांत केवळ एका कॉर्पोरेट हाऊसने प्रवेश करावा का, यावरही मर्यादा असाव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे.

हा प्रयत्न एस. जयपाल रेड्डी माहिती व नभोवाणी मंत्री असताना करण्यात आल्याचा हवाला देत ते म्हणाले की, अनेक देशांत अशा प्रकारची बंधने आहेत. भारतात गेल्या दहा-बारा वर्षांत अशा प्रकारच्या बंधनांची अधिक गरज निर्माण झाली आहे. माईणकरांच्या लेखांची प्रशंसा करत ते म्हणाले की, माईणकरांनी अशा अनेक विषयांना हात घातला आहे, ज्यावर मराठीत फारसे लिहिले जात नाही.

पक्षांतराविषयीचा माईणकरांचा लेख किंवा वाजपेयी, जॉर्ज आणि प्रेमप्रकरण यांसारखे विषयही त्यांनी हाताळले आहेत. तसेच, जेष्ठ पत्रकार कुमार केतकर यांनी आपल्या भाषणात माईणकरांच्या निर्भीड लेखणीची प्रशंसा करत सध्या इतक्या परखड लिखाणाची फार गरज असल्याचे नमूद केले.

जयंत माईणकर लिखित आणि सदामंगल पब्लिकेशन प्रकाशित कटाक्ष या पुस्तकाचे प्रकाशन माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी खासदार व ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, जेष्ठ पत्रकार प्रकाश पोहरे, माजी न्यायमूर्ती द्वय सत्यरंजन धर्माधिकारी व साधना जाधव, सदामंगल प्रकाशनच्या प्रकाशक-संपादक प्रज्ञा जांभेकर आणि जयंत माईणकर उपस्थित होते.

# लाडकी बहीण योजनेमुळे आता महिलांना कर्ज : मुख्यमंत्र्यांची घोषणा

**पुणे, ता. ८ :** महिलांचे आर्थिक सक्षमीकरण अधिक बळकट करण्यासाठी लाडकी बहीण योजनेला शासनाच्या इतर योजनांशी जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या माध्यमातून महिलांना विविध व्यवसाय व उपक्रम ांसाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.



राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व अनुदानाचा आढावा घेतला असता, सर्वसाधारण कर्ज योजनांमध्ये परतफेड करणाऱ्यांचे प्रमाण सुमारे ५० टक्के असल्याचे दिसून येते. मात्र महिलांना बचत गट किंवा इतर म ाध्यमांतून दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या परतफेडीचे प्रमाण ९९ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. त्यामुळे महिलांमध्ये कर्जाचा योग्य वापर करून सक्षम अर्थकारण उभारण्याची क्षमता असल्याचे स्पष्ट होते.

या पार्श्वभूमीवर महिलांना केवळ लाडकी बहीणयोजनेअंतर्गत आर्थिक मदत देण्यापेक्षा त्या योजनेला इतर शासकीय योजनांशी जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अंतर्गत मुंबई बँकेच्या माध्यमातून महिलांना कोणताही जामीन किंवा हमी न देता विविध उपक्रमांसाठी बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. महत्त्वाची बाब म्हणजे लाडकी बहीण योजनेअंतर्गत शासनाकडून मिळणारी आर्थिक मदतच या कर्जाच्या परतफेडीसाठी उपयोगात आणली ज ाणार आहे.

दरम्यान, या उपक्रमा मुळे महिलांना विविध क्षेत्रांत व्यवसाय सुरू करण्यास चालना मिळेल. शासनाच्या उमेद या उपक्रमामार्फत या प्रक्रियेची अंमलबजावणी केली जाणार असून जिल्हानिहाय उभारण्यात येणाऱ्या उमेद मॉलमध्ये महिलांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध होईल. त्यामुळे महिला उद्योग-व्यवसायात मोठ्या खाजगी संस्थांनाही स्पर्धा देतील, असा दावा फडणवीस यांनी केला.

# जागतिक महिला दिनानिमित्त लोणी काळभोर पोलीस ठाण्यात आरोग्य शिबिर

## महिलांच्या आरोग्य तपासणीसह सुरक्षा जनजागृती

**लोणी काळभोर, ता. ८ :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत लोणी काळभोर पोलीस ठाण्यात महिलांसाठी विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अशी माहिती पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी दिली. या शिबिरात ग्राम पंचायतीतील महिला स्वच्छता कर्मचारी, महिला पोलीस पाटील, महिला दक्षता समिती सदस्य तसेच परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या आरोग्य शिबिरात उपस्थित महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच पोलीस प्रशासनाच्या वतीने सर्व महिलांचा पुष्पगुच्छ देऊन



सन्मान करण्यात आला. कार्यक्रमा दरम्यान महिला दक्षता समितीच्या सदस्या स्मिता नार्टन, अंगणवाडी सेविका आशा भंडलकर आणि कु. शुभ्रा रवि आहेर यांनी महिला सक्षमीकरण आणि आरोग्य जागृतीबाबत मनोगत व्यक्त केले. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पुणे शहर पोलीस महिलांच्या सुरक्षेसाठी कटिबद्ध असून महिलांच्या तक्रारी ऐकून घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. तसेच उपस्थित महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छाही देण्यात आल्या.

दरम्यान, या शिबिरासाठी आरोग्य तपासणी करणाऱ्या विश्वराज हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथकाचे पोलीस प्रशासनाने आभार मानले. कार्यक्रमाला वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील, सहायक पोलीस निरीक्षक नाळे, पोलीस उपनिरीक्षक सोनटक्के, पैठणे, महिला अंमलदार तसेच महिला पोलीस पाटील प्रियंका भिसे, रेश्मा कांबळे व सोनाली शिवरकर आदी उपस्थित होत्या.

## संक्षिप्त

### सुसगाव येथे भरधाव मिक्सरने घेतला तरुणीचा बळी

**पिंपरी, ता. ८ :** बंदी झुगारून शहरात आलेल्या काँक्रिट मिक्सर ट्रकने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. या अपघातात १८ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला. ही घटना सुसगाव येथे गुरुवारी शिवबा चौक परिसरात घडली. अंजली शंकर साळवे (वय १८ असे अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या तरुणीचे नाव आहे. याबाबत तिच्या वडिलांनी बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार चालकासह मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंजली साळवे ही दुचाकीवरुन घरी जात असताना काँक्रिट मिक्सर ट्रकने भरधाव वेगाने येऊन तिच्या दुचाकीला जोराची धडक दिली. ज्या रस्त्यावर जड वाहनांना बंदी आहे. त्या रस्त्यावर निष्काळजीपणे ट्रक चालविल्यामुळे हा अपघात घडल्याचे पोलिसांनी सांगितले. बावधन पोलीस तपास करत आहेत.

### पैसे न दिल्याने व्यावसायिकास बेदम मारहाण; चौघे अटकेत

**दापोडी, ता. ८ :** मद्य पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या रागातून चौघांनी एका तरुणाला बेदम मारहाण केली. ही घटना दापोडी येथे मंगळवारी (ता. ०३) रोजी सायंकाळी सव्वाचार वाजताच्या सुमारास घडली.गणेश भिसे, राम अशोक कांबळे (वय २४, रा. सिद्धार्थनगर, दापोडी), संकेत भालचंद्र वाघमारे (वय २०, रा. सिद्धार्थनगर, दापोडी) व वेदांत मोरे (वय २४, रा. सिद्धार्थनगर, दापोडी) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत प्रांशु शाम बारमेडा (वय २५, रा. सांगवी, पुणे) यांनी दापोडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी सव्वाचार वाजताच्या सुमारास आरोपींनी आपसांत संगनमत करून फिर्यादीकडे मद्य पिण्यासाठी एक हजार रुपये मागितले. मात्र फिर्यादी बारमेडा यांनी पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपींनी आम्ही इथले बाप आहोत असे म्हणत फिर्यादीला मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादीच्या नाकाला गंभीर दुखापत होऊन नाकाचे हाड फ्रॅक्चर झाले. दापोडी पोलीस तपास करत आहेत.

### चऱ्होलीत गांजासह एकाला अटक

**चऱ्होली, ता. ८ :** अवैधरित्या गांजा विक्रीसाठी ठेवलेल्या एका व्यक्तीला पोलिसांनी अटक केली. ही कारवाई ६ मार्च रोजी रात्री आठ वाजताच्या सुमारास चऱ्होली येथे करण्यात आली.महादेव जीवन शिंदे (वय ५२, रा. वडमुखवाडी, ता. हवेली, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत पोलीस शिपाई सोमनाथ बाळू खळसोडे (वय-३८) यांनी शुक्रवारी (ता. ०६) दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीकडे ३६२ ग्रॅम वजनाचा अंदाजे १८ हजार १०० रुपये किंमतीचा गांजा विक्रीसाठी बाळगलेला आढळून आला. पोलिसांनी त्याच्याकडून हा मुद्देमाल जप्त केला आहे. दिघी पोलीस तपास करत आहेत.

# रायगडावरून मनसेच्या सदस्य नोंदणीला सुरुवात होणार; २० व्या वर्धापनदिनानिमित्त राज ठाकरेंची मोठी घोषणा

**मुंबई, ता. ८ :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे ( यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतर एक मोठा आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मनसेच्या २० व्या वर्धापनदिनाच्या (९मार्च २०२६) पार्श्वभूमीवर त्यांनी पक्षाच्या सदस्य नोंदणी मोहिमेला राज्यव्यापी स्वरूप देण्याची घोषणा केली आहे. ही मोहीम १० मार्च २०२६पासून सुरू होणार असून, त्याची सुरुवात राज ठाकरे स्वतः रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून करणार आहेत.



राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर (फेसबुक, इंस्टाग्राम इत्यादी) पोस्ट करून ही माहिती दिली. त्यांनी लिहिले, माझ्या तमाम महाराष्ट्र सैनिकांना, सस्नेह जय महाराष्ट्र! आपल्या पक्षाचा ९ मार्च २०२६ ला २० वा वर्धापनदिन. मराठी माणूस आणि मराठी भाषा यांच्यासाठी आक्रमकपणे लढणाऱ्या पक्षाचा आणि एका विचाराचा हा वर्धापनदिन आहे. या निमित्ताने पक्षाची सदस्य नोंदणी १० मार्च २०२६ पासून सुरू होत आहे. सकाळी रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून माझ्यापासून सदस्य नोंदणीची सुरुवात होणार आहे.

रायगडाचे विशेष महत्त्व राज ठाकरे यांनी रायगड किल्ल्याचे विशेष महत्त्व अधोरेखित केले. रायगडाने छत्रपती शिवरायांचं वास्तव अनुभवलं आहे. त्यांचा शिवराज्याभिषेकाचा साक्षीदार देखील हा किल्लाच आहे. या पावन ठिकाणी सदस्य नोंदणी सुरू करत आहोत, असे ते म्हणाले. सकाळी वाजता किल्ल्याच्या पायथ्याशी हा शुभारंभ होणार असून, प्रमुख उपस्थितीत राज ठाकरे स्वतः असतील.

दरम्यान, मनसेच्या या सदस्य नोंदणी मोहिमेमुळे पक्षाची ताकद महाराष्ट्रभर वाढणार असल्याचे बोलले जात आहे. हे पाऊल मनसेला नवीन ऊर्जा देणारे आणि मराठी अस्मितेच्या लढ्यात मजबूत करणारे ठरणार असल्याचे दिसते. वर्धापनदिनानिमित्त राज ठाकरेंची ही रणनीती पक्षाच्या पुनरुज्जीवनासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकते.

### आकड्यापेक्षा भावना महत्त्वाची

राज ठाकरे यांनी सांगितले की, प्रश्न केवळ आकड्यांचा नाही. तशीही सदस्य नोंदणी ही कायम मोठीच होते. पण यावेळेस मराठी म्हणून सामान्य मराठी माणसाची महाराष्ट्राचा पाईक होण्याची इच्छा किती तीव्र आहे, सरकार किती चुकीच्या पद्धतीने सर्व गोष्टी हाताळते आहे याचा राग सर्वांच्या मनात किती आहे, हे स्पष्ट होईल. त्यामुळे जोरदार सदस्य नोंदणी होईल, यासाठी प्रयत्न करा.

### तरुणीचा विनयभंग करणारा डिलिव्हरी बॉय गजाआड

**शिवाजीनगर, ता. ८ :** ऑनलाइन वस्तू घरपोच देणाऱ्या डिलिव्हरी बॉयने एका तरुणीचा विनयभंग केल्याची घटना शिवाजीनगर गावठाण भागात घडली. पाणी मागण्याचा बहाणा करुन त्याने तरुणीचा विनयभंग केला. पसार झालेल्या डिलिव्हरी बॉयला शिवाजीनगर पोलिसांनी अटक केली.

श्रीधर हरीभाऊ कांबळे (वय -२७, सध्या रा. शुक्रवार पेठ, मूळ रा. कराड, जि. सातारा) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत एका तरुणीने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजीनगर गावठाण परिसरात मार्च रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास कांबळे हा तरुणीच्या घरी आला. तरुणीने ऑनलाइन खरेदी केली होती. वस्तू देत असताना त्याने तरुणीकडे पाणी मागितले. तरुणीने त्याला पाणी दिले. तेव्हा तुम्ही खूप सुंदर दिसता, असे कांबळे म्हणाला. कांबळेच्या वर्तनामुळे तरुणी घाबरली. तिने आरडाओरडा केला. कांबळे तेथून पसार झाला.

# शेततळ्यात बुडून चौथीतील चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू; न्हावरे परिसरात हळहळ

**योगेश मारणे**

न्हावरे, ता. ८ : कोकडेवाडी (ता. शिरूर) येथे शेततळ्यात बुडून एका लहान शाळकरी मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (ता. ०७)घडली. या घटनेची नोंद न्हावरे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून सात्विक अण्णासाहेब कोकडे (वय १०)असे मृत्यू झालेल्या लहान मुलाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सात्विकचे आई-वडील कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. शनिवारी अर्धा दिवसाची शाळा सुटल्यानंतर सात्विक कोकडेवाडी परिसरातील वस्तीवरील घरी आला. दुपारी सुमारे चारच्या सुमारास सात्विक घराबाहेर खेळण्यासाठी गेला होता.



मात्र, सायंकाळपर्यंत तो घरी परत न आल्याने नातेवाईकांनी त्याचा शोध सुरू केला.

शोध घेत असताना घरापासून काही अंतरावर असलेल्या शेततळ्यात सात्विकचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. त्यानंतर नातेवाईकांनी तातडीने सात्विकला न्हावरे येथील ग्रामीण रुग्णालयात नेले. मात्र,वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

सात्विक हा न्हावरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत चौथी इयत्तेत शिकत होता. तो अभ्यासात अतिशय हुशार व शांत स्वभावाचा विद्यार्थी म्हणून ओळखला जात होता. या दुर्दैवी घटनेमुळे न्हावरे व कोकडेवाडी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी सात्विकचे चुलते भाऊसाहेब कानिफ कोकडे यांनी न्हावरे पोलीस ठाण्यात खबर दिली आहे. सात्विकच्या पश्चात आई-वडील व एक लहान भाऊ असा परिवार असून त्याच्यावर मोठ्या शोकाकुल वातावरणात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**शेततळी व पाणवठ्यांजवळ मुलांची सुरक्षितता महत्त्वाची..**

ग्रामीण भागात शेततळी, विहिरी व पाणवठे मोठ्या प्रमाणात असल्याने लहान मुलांसाठी ते धोकादायक ठरू शकतात. त्यामुळे पालकांनी काही गोष्टींकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. लहान मुलांना पाण्याच्या ठिकाणी एकटे जाऊ देऊ नये. शेततळे किंवा विहिरीभोवती शक्य असल्यास कुंपण करावे. मुलांना पोहणे व पाण्याजवळील धोके याबाबत लहानपणापासून मार्गदर्शन करावे. मुलं घराबाहेर खेळायला गेल्यानंतर त्यांच्या हालचालींकडे लक्ष ठेवावे. थोडीशी सावधगिरी आणि जागरूकता ठेवली तर अशा दुर्दैवी घटना टाळता येऊ शकतात.

# तृणमूल काँग्रेस सरकारने सर्व मर्यादा ओलांडल्या : नरेंद्र मोदी

**पश्चिम बंगाल, ता. ८ :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि केंद्रातील मोदी सरकारमधील संघर्ष पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या दार्जिलिंग दौऱ्यात ममता बॅनर्जी यांच्याकडून राष्ट्रपतींचा अवमान करण्यात आल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे. त्यासोबतच लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या तसेच आदिवासी समाजाच्या सक्षमीकरणावर श्रद्धा असलेल्या सर्व नागरिकांसाठी ही घटना लज्जास्पद आणि अभूतपूर्व असल्याची प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्यक्त केली.

आदिवासी समाजातून आलेल्या राष्ट्रपतींनी स्वतः व्यक्त केलेल्या वेदना आणि संतापामुळे देशातील जनतेच्या मनात मोठी खंत असून दुःख झालं आहे. पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस सरकारने सर्व मर्यादा ओलांडल्या,



राष्ट्रपतींचा झालेला हा अपमान राज्यातील प्रशासनामुळेच घडल्याचे मोदींनी ट्विटरवरुन म्हटलं आहे. संताल संस्कृतीसारख्या महत्त्वाच्या विषयाकडे पश्चिम बंगाल सरकारने अत्यंत हलगर्जीपणे पाहिले. राष्ट्रपती हे पद राजकारणापलिकडचे असून त्या पदाची प्रतिष्ठा आणि पावित्र्य कायम राखले गेले पाहिजे. पश्चिम बंगाल सरकार आणि तृणमूल काँग्रेसला यापुढे तरी सुबुद्धी येईल, अशा संतप्त आणि उपरोधात्मक भावना पंतप्रधानांनी व्यक्त केल्या आहेत.

# बुलढाणा जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गावर खाजगी बसला आग

**बुलढाणा, ता. ८ :** मध्यप्रदेशातील इंदोर येथून निघालेल्या खासगी बसमधील प्रवाशांसह बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा परिसरातील नागरिकांनी शनिवारी धावत्या बसला लागलेल्या आगीचा थरार अनुभवला. अचानक लागलेल्या आगीमुळे बसमधील सुमारे ३० प्रवाशांच्या जीवाचा अक्षरशः थरकाप उडाला. मात्र सुदैवाने सर्व प्रवासी सुखरूप बचावल्याने मोठी दुर्घटना टळली. ही घटना राष्ट्रीय महामार्गावरील नांदुरा शहराजवळ शनिवारी (७ मार्च) हि घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, वेगाने धावणाऱ्या खासगी बसला अचानक आग लागली. धुराचे लोट दिसताच चालकाने तत्काळ बस रस्त्याच्या कडेला थांबवली. त्यानंतर बसमधील सर्व प्रवाशांना तातडीने खाली उतरवण्यात आले. दरम्यान,



घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी पेटलेल्या बसवर पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी बसचे मोठे नुकसान झाले आहे. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने सर्व प्रवासी सुरक्षित बचावल्याने त्यांनी देवाचे आभार मानले.

### सयाजी बरकडे यांचे निधन



**उरुळी कांचन, ता. ८ :** सोरतापवाडी (ता. हवेली) येथील शेतकरी व मेंढपाळ व्यावसायिक सयाजी भिवाजी बरकडे (वय -८९) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. हवेली तालुक्यातील बरकडे कॉम्प्युटर एज्युकेशनचे दत्तात्रय बरकडे यांचे ते वडील होत.

# शक्तिपीठच्या भूसंपादनाबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेणार

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली माहिती

**परभणी, ता. ८ :** परभणी जिल्ह्यातील २० गावातून शक्तिपीठ महामार्ग जाणार असून, शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या असून येथील महामार्गाच्या भूसंपादनातील मोजणी प्रक्रियेबाबत लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत चर्चा करून निर्णय घेतला जाईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.



मंत्री बावनकुळे यांच्यासोबत मंत्रालयात परभणी जिल्ह्यातील महामार्गातील भूधारक शेतकऱ्यांची बैठक झाली यावेळी ते बोलत होते. हा महामार्ग राज्यातील विविध जिल्ह्यातून जात असून यासाठी मोजणी प्रक्रिया ६० ते ७० टक्के पूर्ण झाली आहे. वर्धा जिल्ह्यात भूसंपादनासाठी ९० टक्के मोजणी झाली आहे. परभणी जिल्ह्यात गावातील बहुसंख्य जमीन ही शेतीसाठी असून शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादन व मोजणीस विरोध आहे. याप्रसंगी खासदार जाधव यांनी शेतकऱ्यांच्यावतीने मोजणी प्रक्रियेस होत असलेल्या विरोधाबाबत माहिती दिली. तसेच विविध शेतकरी यांनी आपली बाजू मंत्री बावनकुळे यांच्यासमोर सादर केली. तसेच, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट जेएनपीटी ते पुणे मुंबई एक्सप्रेस हायवे यांना जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३४८ पागोटे ते चौक हा ग्रीन फील्ड कॅरिडॉर वेगात पूर्ण होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, असे बावनकुळे यांनी सांगितले.

# वैमनस्यातून मार्केट यार्ड परिसरात एकावर पिस्तुलातून गोळीबार

**पुणे, ता. ८ :** वैमनस्यातून एकावर पिस्तुलातून गोळीबार करण्यात आल्याची घटना मार्केट यार्ड भागात शुक्रवारी रात्री घडली. गोळीबार एक तरुण जखमी झाला आहे. गुलटेकडीतील मीनाताई ठाकरे वसाहत परिसरातील दोन टोळ्यांमधील वर्चस्वातून गोळीबार झाल्याचे तपासात उघडकीस आले आहे. या प्रकरणी सराइतांसह सात ते आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आठवड्यापूर्वी गुलटेकडीत अल्पवयीनांनी पिस्तुलातून गोळीबार करुन दहशत माजविल्याची घटना घडली होती.

मोझेस शेकापुरे उर्फ मोझ्या (वय २२, रा. मीनाताई ठाकरे वसाहत, गुलटेकडी) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी सात ते आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी



दिलेल्या माहितीनुसार, गुलटेकडीतील मीनाताई ठाकरे वसाहतीत उमाप टोळी आणि अमित शेकापुरे यांच्यात वर्चस्वातून वाद आहे. शुक्रवारी दुपारी बालाजी उमाप आणि अमित शेकापुरे यांच्यात वाद झाला होता. त्यानंतर शुक्रवारी (ता. ०६) रात्री साडेअकराच्या सुमारास अमित शेकापुरे याचा भाऊ मोझेस आणि त्याचा मित्र हे दुचाकीवरुन मार्केट यार्डातील वखार महामंडळाकडून गंगाधाम चौकाकडे निघाले होते.

त्या वेळी त्यांच्या मागावर असलेले आरोपी दुचाकीवरुन आले. हल्लेखोरांनी शेकापुरे आणि त्याच्याबरोबर असलेल्या मित्राला अडवले. आरोपींनी पिस्तुलातून गोळीबार केला. गोळी शेकापूरे याच्या पाठीत शिरल्याने तो गंभीर जखमी झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या शेकापुरेला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. हल्लेखोरांना शेकापुरे याच्याबरोबर असलेल्या मित्रावर गोळीबार करायचा होता.

मात्र, गोळीबार शेकापुरे जखमी झाल्याची माहिती तपासात मिळाली आहे. खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात येत आहे.

# संतोष देशमुख प्रकरणातील आरोपी १४ महिन्यानंतर येणार जेलबाहेर

**बीड, ता. ८ :** सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडवर देशमुख हत्या प्रकरण आणि आवादा खंडणीचे आरोप झाल्यानंतर धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला.

मात्र या प्रकरणातील आणखी एक महत्त्वाचा आरोपी जयराम चाटे १४ महिन्यांनंतर काही तासांसाठी जेलबाहेर येणार आहे. त्याचे कारण म्हणजे, जयराम चाटेचा धाकटा भाऊ श्रीराम चाटे याचे २ मार्च रोजी तांबवा गावात निधन झाले. निधनानंतर होणाऱ्या धार्मिक विधीस उपस्थित राहण्यासाठी न्यायालयाने त्याला पोलीस बंदोबस्तात जाण्याची परवानगी दिली आहे.

दरम्यान, हिंदू धर्मपरंपरेनुसार निधनानंतर बाराव्या दिवशी होणाऱ्या धार्मिक विधीला उपस्थित राहण्यासाठी जयराम चाटेच्या



वकिलांनी न्यायालयात विशेष परवानगी मागितली होती. या अर्जावर ६ मार्च रोजी जिल्हा व विशेष न्यायालयात सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे यांनी या अर्जाला विरोध दर्शवला होता. मात्र सर्व बाजूंचा विचार करून न्यायालयाने आरोपी जयराम चाटेला सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत पोलीस बंदोबस्तात धार्मिक विधीस उपस्थित राहण्याची परवानगी दिली. तसेच न्यायालयाने घालून दिलेल्या सर्व अटी व नियमांचे काटेकोरपणे पालन त्याला करावे लागणार आहे. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, जयराम चाटेला पोलीस बंदोबस्ताचे शुल्क स्वतः भरावे लागेल.

# सुनील तटकरेंचं नाव घेत राष्ट्रवादीतील अनेक बड्या पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

**पुणे, ता. ८ :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अंतर्गत नाराजी आता उघडपणे समोर येऊ लागली आहे. पक्षात सन्मान मिळत नाही आणि अपेक्षित सहकार्यही मिळत नाही, असा आरोप करत आणखी एका प्रदेशाध्यक्षाने आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत हे राजीनामे दिले जात असल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

महानगरपालिका कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य संघटनेचे प्रदेशाध्यक्ष गौतम खरात यांनी आपल्या पदाचा तसेच पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचाही राजीनामा दिला आहे. खरात यांनी आपल्या पत्रात स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त



करत, मी आजवर अत्यंत निष्ठेने पक्षाचे काम केले. मात्र प्रदेश पातळीवरून अपेक्षित मार्गदर्शन किंवा सहकार्य मिळाले नाही, असे नमूद केले आहे.

तसेच पक्षात केवळ ठराविक लोकांचा आणि त्यांच्या नातेवाईकांचाच सन्मान केला जात असून त्यांनाच पदे दिली जात असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा अवमान होत असल्याने आपण पक्ष सोडत असल्याचे त्यांनी जाहीर केले.

### अजित पवार यांच्या काळातील राजीनामा नाट्य

या प्रकरणाची सुरुवात २६ जानेवारी रोजी घडलेल्या घटनांपासून झाल्याचे सांगितले जाते. सुनील तटकरे यांच्या कार्यपद्धतीवर नाराज होऊन काही सेलच्या प्रदेशाध्यक्षांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे राजीनामे दिले होते. मात्र त्या वेळी अजित पवार यांनी हे राजीनामे स्वीकारण्यास नकार देत संबंधित पदाधिकाऱ्यांना चर्चेसाठी मुंबईत बोलावले होते.

### एकामागून एक राजीनामे

राष्ट्रवादी काँग्रेसमधील हे राजीनामा सत्र केवळ एका पदाधिकाऱ्यापुरते मर्यादित नाही. गौतम खरात यांच्याआधी राष्ट्रवादी मोटर मालक वाहतूक सेलचे सचिन जाधव, उद्योग विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुभाष मालवणी आणि असंघटित कामगार विभागाचे प्रदेशाध्यक्ष मनोज व्यवहारे यांनीही आपल्या पदांचे राजीनामे दिले आहेत.

या सर्व नेत्यांनी थेट किंवा अप्रत्यक्षपणे सुनील तटकरे यांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेतला आहे. पक्षात जुन्या आणि निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलून नव्या समीकरणांना महत्त्व दिले जात असल्याची भावना पदाधिकाऱ्यांमध्ये वाढत आहे.



# आळंदीतील जाहूरकर महाराज संस्था तात्काळ बंद; १२ वर्षीय मुलीवर शोषणाचे प्रकरण उघड

**आळंदी, ता. ८ :** आळंदी येथील जाहूरकर वारकरी शिक्षण संस्थेत बारावर्षीय मुलीचे शोषण झाल्याचा प्रकार समोर आला होता. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने संस्थेची प्रत्यक्ष पाहणी केल्यावर त्रुटी आढळल्याने संस्थेवर कारवाई करून संस्था बंद करण्यात आली आहे. तसेच येथील ४३ मुले आणि ४ मुलींचे शासकीय बालगृहात पुनर्वसन करण्यात आले आहे.

आळंदी येथील जुन्या एसटी स्टॅण्डलगत जाहूरकर महाराज यांचे नावे वारकरी शिक्षण संस्था आहे. येथे शालेय मुलांचे शिक्षण, तसेच वारकरी सांप्रदायिक शिक्षण दिले जात होते. या संस्थेतील ४३ मुले व ४ मुलींना ज्ञानेश बालमंदिर, फुलगाव (मरकळ रोड), ज्ञानमंदिर बालगृह, (नारकरवाडी, ता. आंबेगाव, सह्याद्री बालगृह; पंकटिका, घोडेगाव रोड, मंचर) या तीन शासकीय मान्यता प्राप्त बालगृहांत पाठविले आहे. मुख्याधिकारी माधव खांडेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, सीमा चारभे, प्रदीप आवारी, वैशाली पाटील, मिथिल पाटील, पूजा नाईक, श्वेता शेलकर, अर्जुन घोडे, शत्रुघ्न खोकले, मच्छिंद्र शेंडे यांनी ही कारवाई केली.

# अर्थसंकल्पातील नीरा-कऱ्हा उपसा सिंचन प्रकल्प केवळ घोषणा; खासदार सुप्रिया सुळे यांची टीका

**बारामती, ता. ८ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात नीरा-कऱ्हा उपसा सिंचन प्रकल्पाची घोषणा केली आहे. मात्र, या योजनेसाठी निधीची तरतूद केलेली नाही. त्यामुळे ही केवळ घोषणाच असल्याचे स्पष्ट होत आहे, अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. हा प्रकल्प कधी आणि कसा पूर्ण करणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

राज्याच्या अर्थसंकल्पात नीरा-कऱ्हा उपसा सिंचन प्रकल्पाबाबत केलेल्या घोषणेबाबत खासदार सुप्रिया सुळे यांनी समाज माध्यमावरून टीका केली आहे. ही निव्वळ घोषणा ठरू नये, ठोस निधीची तरतूद करून काम सुरू होण्याच्या दृष्टीने आखणी करण्यात यावी. त्यामुळे



बारामती आणि पुरंदर तालुक्यातील अवर्षणग्रस्त नागरिकांत संभ्रम राहणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

बारामती आणि पुरंदर तालुक्यातील अवर्षणग्रस्त गावांतल्या शेतजमिनी ओलिताखाली आणणे तसेच पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी नीरा व कऱ्हा नदीच्या पाण्याची महत्त्वाकांक्षी उपसा सिंचन योजना ही दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्वप्न होते. या योजनेच्या माध्यमातून या भागातील गावांवरील जिरायती भाग हा शिक्का कायमस्वरूपी पुसून टाकणे शक्य आहे. त्यासाठी अजित पवार हे प्रयत्नशील होते, असे खासदार सुळे यांनी नमूद केले आहे.

बारामती तालुक्यातील कण्हेरी या ठिकाणी २४ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या जाहीर सभेत अजित पवार यांनी या योजनेचा उल्लेख केला होता. या योजनेसाठी १ हजार कोटी रुपयांची तरतूद करत असून त्या माध्यमातून सुमारे अडीच टीएमसी पाणी साठविण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर केला. त्यात त्यांनी विविध प्रकल्पांची घोषणा केली. नीरा-कऱ्हा उपसा सिंचन प्रकल्पाचाही उल्लेख केला.

मात्र, त्यासाठी निधीच्या तरतुदींचा उल्लेख केला नाही, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी नमूद केले. राज्यातील अन्य सिंचन प्रकल्पांच्या घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी निधीसहीत जाहीर केल्या आहेत. त्यात बारामती आणि पुरंदर तालुक्यासाठी अतिशय महत्त्वाच्या असलेल्या नीरा-कऱ्हा उपसा सिंचन प्रकल्पाबाबत मात्र त्यांनी निव्वळ घोषणाच केल्याचे दिसत आहे. त्यामुळे शासनाची या प्रकल्पाबाबत नेमकी काय भूमिका आहे, याबाबत जनतेमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. असेही त्यांनी म्हटले आहे.

# स्वस्तात सोने देण्याच्या आमिषाने ज्येष्ठ महिलेची एक कोटी ३४ लाखांची फसवणूक

**पुणे, ता. ८ :** स्वस्तात सोने देण्याच्या आमिषाने ज्येष्ठ महिलेची एक कोटी ३४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांकडून दाम्पत्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, हेमंत दत्तात्रय खरोटे (वय-४५), रुपाली हेमंत खरोटे (वय -३८, रा. शिवशंभोनगर, कात्रज-कोंढवा रस्ता) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ६१ वर्षीय महिला कात्रज भागातील एका सोसायटीत




राहायला आहेत.


आरोपींशी त्यांची ओळख होती. दोन वर्षांपूर्वी आरोपी दाम्पत्याने त्यांना स्वस्तात सोने मिळवून देतो, असे आमिष दाखविले. त्यानंतर त्यांना मोबाइलवरुन सोन्याचे बिस्कीट, तसेच दागिन्यांची छायाचित्रे पाठविली. सोन्याचा सध्या दर कमी आहे. येत्या काही दिवसात सोन्याचे दर वाढणार आहे. गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष त्यांना आरोपींनी दाखविले. तक्रारदार महिला आणि त्यांच्या पतीला सोन्यात गुंतवणूक करण्यास सांगितले. त्यानंतर त्यांच्याकडून वेळोवेळी एक कोटी ४९ लाख ९५ हजार रुपये घेतले. आरोपींनी त्यांना सात लाख २३ हजार रुपयांचे सोने, तसेच सात लाख ९० हजार रुपये दिले. त्यानंतर त्यांना उर्वरित रक्कम, तसेच स्वस्तात सोने मिळवून दिले नाही. परतावा न मिळाल्याने ज्येष्ठ महिला आणि पतीने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. आरोपी दाम्पत्याने एक कोटी ३४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे ज्येष्ठ महिलेने फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक भोसले तपास करत आहेत.

# महिलांना आता एका क्लिकवर घरबसल्या तक्रार नोंदविता येणार : सुनेत्रा पवार

**बारामती, ता. ८ :** महिलांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आता तत्काळ दाद मागणे शक्य होणार आहे. यासाठी राज्य महिला आयोगाकडून विशेष पोर्टल तयार करण्यात आले आहे. यामुळे घरबसल्या कुठूनही एका क्लिकवर तक्रार नोंदविता येणार आहे.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात आज उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते महिला सन्मान पोर्टलचे उद्घाटन करण्यात आले. महिलांवरील अन्याय अत्याचार कमी व्हावेत, अत्याचारांविरोधात आवाज उठवता यावा याकरता या पोटलच्या माध्यमातून एक ऑनलाइन व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आल्याचे सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

या पोर्टलमुळे महाराष्ट्रातील महिलांना, मुलींना त्यांच्यावर



अत्याचार किंवा सायबर गुन्हे झाले तर ऑनलाइन तक्रार नोंदवू शकता. हे पोर्टल संबंध पोलीस यंत्रणेशी जोडलं गेलं आहे. त्यांची तक्रार लगेच नोंदवली जाईल. त्यातून तत्काळ न्याय मिळण्याची व्यवस्था यात आहे. ज्या मुली, महिला तक्रार करायला घाबरतात त्यांना याचा फायदा होणार आहे, असे सुनेत्रा पवार म्हणाल्या.

# खामेनींच्या हत्येचा बदला घेतल्याशिवाय मागे हटणार नाही; इराणचा निर्धार

**नवी दिल्ली, ता. ८ :** मध्य पूर्वेत अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होत चालला आहे. इराणच्या सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर परिस्थिती अधिक चिघळली असून इराणकडून अमेरिकेच्या लष्करी तळांवर आणि मालमत्तांवर हल्ले केल्याचा दावा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर इराणचे सुरक्षा प्रमुख अली लारीजानी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना कठोर इशारा दिला आहे. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी अमेरिका आणि इस्रायलने संयुक्त कारवाई करत इराणवर हल्ला केला होता.

या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. तसेच या युद्धात आतापर्यंत शेकडो इराणी नागरिकांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. या घटनेनंतर इराणने बदला घेण्याची भूमिका घेतली आहे.

इराणचे सुरक्षा प्रमुख अली लारीजानी यांनी सरकारी दूरचित्रवाणीशी बोलताना स्पष्ट इशारा दिला की, आमच्या नेत्याच्या रक्ताचा बदला घेतल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. डोनाल्ड ट्रम्प यांनी जे केले त्याची किंमत त्यांना चुकवावी लागेल. त्यांनी आमच्या नेत्याला मारले आणि हजाराहून अधिक लोक शहीद झाले. ही साधी गोष्ट नाही.

दरम्यान, लारीजानी यांच्या वक्तव्यांवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. सीबीएस न्यूजशी बोलताना ट्रम्प म्हणाले, तो कोण आहे, तो काय बोलतो आहे याची मला काहीच कल्पना नाही. मला त्याची अजिबात पर्वा नाही. त्यांनी इराणी नेतृत्व कमकुवत झाल्याचा दावा करत अमेरिकेच्या लष्करी कारवाया सुरू राहतील असेही स्पष्ट केले. ट्रम्प यांनी पुन्हा एकदा इराणने बिनशर्त शरणागती स्वीकारावी, अशी मागणी केली. त्यामुळे मध्यपूर्वेतील तणाव आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ट्रम्पला सोडणार नाही लारीजानी यांनी पुढे सांगितले की, ट्रम्प यांनी इराणच्या प्रतिक्रियेचा चुकीचा अंदाज लावला आहे. त्यांना वाटले व्हेनेझुएलामध्ये जे घडले ते इराणमध्येही घडेल. पण आता ते स्वतःच या संघर्षात अडकले आहेत. आम्ही ट्रम्पला सोडणार नाही, असे ते म्हणाले. याचबरोबर सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत त्यांनी पुन्हा एकदा इशारा दिला की, जोपर्यंत आम्ही बदला घेत नाही, तोपर्यंत आम्ही मागे हटणार नाही.






Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## दुपारच्या जेवणात ताक पिण्याचे फायदे जाणून तुम्हीही थक्क व्हाल

आपल्या आहारात दही असणे हे खूप महत्त्वाचे आहे. परंतु रोज दही खाणे शक्य नसल्यास, किमान आपल्या आहारात ताकाचा समावेश गरजेचा आहे. खासकरुन उन्हाळ्यामध्ये आपल्याआहारात ताकाचा समावेश हा करायलाच हवा. ताकामुळे पचन सुलभ होते तसेच ताकात काळे मीठ घालून पिल्याने त्याचा अधिक फायदा शरीराला मिळतो. ताक पिण्याची सर्वोत्तम वेळ म्हणजे दुपारच्या जेवणाची वेळ. जेवणासोबत एक ग्लास ताजे घरी बनवलेले ताक प्यायल्याने पचनक्रिया सुधारते. यावेळी ताक पिल्याने पोटफुगी, गॅस आणि आम्लता कमी होण्यास मदत होते.

दुपारच्या जेवणात ताक पिण्याचे फायदे : जेवणासोबत एक ग्लास ताक पिल्याने पचन सुधारते. जेवणानंतर लोकांना अनेकदा गॅस किंवा आम्लतेचा त्रास होतो, म्हणून जेवणासोबत एक ग्लास ताक पिण्याची शिफारस केली जाते.

ताकामध्ये कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी असते. ते प्यायल्याने हाडे आणि स्नायू मजबूत होतात. दररोज एक ग्लास ताक प्यायल्याने दात मजबूत होण्यास मदत होते.

ताक हे एकमेव दुग्धजन्य पदार्थांपैकी एक आहे ज्यामध्ये कॅलरीज खूप कमी असतात. ताक वजन कमी करण्यास आणि ऊर्जा दोन्हीसाठी उपयुक्त आहे. दुपारच्या जेवणासोबत एक ग्लास ताक प्यायल्याने तुम्हाला पोट भरण्यास आणि पोट भरण्यास मदत होते.

ताकात असे अनेक घटक असतात जे शरीराला रोगांशी लढण्यास मदत करतात. ताकामुळे रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत होते.

दुपारच्या जेवणात एक ग्लास ताक प्यायल्याने शरीर विषमुक्त होते.

ताक यकृत आणि इतर अवयवांवर परिणाम करणारे विषारी पदार्थ बाहेर काढू शकते.

ताक पिल्याने डिहायड्रेशन टाळता येते. रोजच्या जेवणासोबत एक ग्लास ताक प्यायल्याने तुमचे शरीर ताजेतवाने आणि हायड्रेटेड राहते.

दुपारच्या जेवणासोबत एक ग्लास ताक प्यायल्याने रक्तदाब कमी होण्यास मदत होते. रक्तदाब असंतुलित असलेल्यांनी जेवणासोबत एक ग्लास ताक प्यावे. यामुळे हृदयरोगांपासूनही आराम मिळतो.

ताकात कॅलरीज कमी असतात. हे पेय पिल्याने वजन कमी होण्यास मदत होऊ शकते. वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी त्यांच्या दुग्धजन्य पदार्थांच्या आहारात ताकाचा समावेश करावा.

# कोणत्याही बँकेतून २ लाखांपर्यंत घेतलेलं पीककर्ज आम्ही माफ करणार : मुख्यमंत्री

**मुंबई, ता. ८ :** अर्थसंकल्पात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीची घोषणा करत शेतकऱ्यांना दिलासा दिला. राज्य सरकार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना राबवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज माफ करण्यात येणार आहे.



मात्र या कर्जमाफीसाठी पात्र शेतकरी नेमके कोणते असणार? याबाबत निर्माण झालेला संभ्रम स्वत: मुख्यमंत्री फडणविसांनी दूर केला. तसेच विरोधकांच्या टीकेलाही प्रत्युत्तर दिले आहे. शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र समितीही स्थापन रण्यात आली आहे.

दरम्यान, ज्या शेतकऱ्यांचे पीक कर्ज ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत होते, अशा पात्र शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे. तसेच जे शेतकरी आपल्या कर्जाचे हप्ते वेळेवर आणि नियमितपणे भरत आहेत, अशा प्रामाणिक शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे.

कोणत्याही बँकेचे दोन लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज माफ होणार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीबाबत स्पष्ट करताना काही अफवा पसरवल्या जात असल्याचे सांगितले. काहीजण राष्ट्रीयकृत बँकांचे कर्ज माफ होणार नाही, तर काहीजण जिल्हा बँका किंवा सहकारी संस्थांच्या कर्जाबाबत संभ्रम निर्माण करत आहेत. कोणी म्हणतंय, राष्ट्रीयकृत बँक, जिल्हा बँक किंवा अमूक एका सोसायटीची कर्जमाफी होणार नाही. पण आम्ही लाखांपर्यंत कोणतीही बँक असो ज्यांना पीक कर्ज देण्याचा अधिकार आहे, अशा कोणत्याही बँकेतून घेतलेलं पीककर्ज माफ करणार आहे, असे मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका, सहकारी बँका किंवा पतसंस्था अशा सर्व ठिकाणांहून घेतलेल्या पीक कर्जाचा या योजनेत समावेश होणार आहे.

### कोणते शेतकरी पात्र ठरणार?

- दोन लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज थकीत असलेले शेतकरी.
- केवळ पीक कर्ज थकबाकी असलेले शेतकरीच या योजनेसाठी पात्र असतील.
- ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेले कर्ज माफीसाठी ग्राह्य धरले जाईल.
- नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर आर्थिक लाभ दिला जाईल.

**कर्जमाफीचा फायदा बँकांना नाही तर थेट शेतकऱ्यांना**

कर्जमाफीचा फायदा बँकांना नव्हे तर थेट शेतकऱ्यांना मिळावा यासाठी योजना तयार केली जात आहे. आम्ही यापूर्वीच सांगितलं की, ३० जूनच्या आधी आपण कर्जमाफी करणार आहोत. त्यामुळे अर्थसंकल्पात ती आली असल्यामुळे पुढील कार्यवाही सुरू होईल. कमिटी यावर काम करत आहे. कमिटी बाकी सगळ्या गोष्टी सांगेल. जुन्या कोणत्याही कर्जमाफीपेक्षा चांगली ही कर्जमाफी असेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

## चाकणमध्ये 'बिजनेस ईमेल'द्वारे लाखांना गंडा

**चाकण, ता. ८ :** बनावट ई-मेल आयडी तयार करून दोन कंपन्यांमधील व्यवहारात हस्तक्षेप करत एकाकडून ८ लाख ८१ हजार ९४२ रुपयांची फसवणूक करण्यात आली. हा प्रकार चाकण परिसरातील कंपनीत ऑनलाइन व्यवहारादरम्यान घडला.

या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका कंपनीतील पुरुष फिर्यादीने चाकण उत्तर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका कंपनीचा अधिकृत ई-मेल आयडी वापरून चीनमधील कंपनीशी पत्रव्यवहार सुरू होता. दरम्यान, अज्ञात व्यक्तीने बनावट व मूळ कंपनीसारखे दिसणारे ई-मेल आयडी तयार करून व्यवहारात प्रवेश केला. त्यानंतर कंपनीच्या नावाने वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास सांगितले. या फसवणुकीत कंपनीकडून ५२००० व ५०४५.७ डॉलर इतकी रक्कम घेऊन भारतीय चलनामध्ये एकूण ८ लाख ८१ हजार ९४२ रुपयांचा अपहार करण्यात आला.

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील तीन बंडखोर नगरसेवकांना अंतिम नोटीस

**कल्याण, ता. ८ :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील तीन बंडखोर नगरसेवकांविरोधात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने कडक भूमिका घेतली आहे. संबंधित नगरसेवकांना ४८ तासांची अंतिम नोटीस देण्यात आली असून समाधानकारक उत्तर न दिल्यास त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई केली जाऊ शकते.



मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत ठाकरे गटाचे ११ नगरसेवक निवडून आले होते. मात्र निकालानंतर नगरसेवक राहुल कोट, मधूर म्हात्रे, कीर्ती ढोणे आणि स्वप्निनी केणे हे काही काळ संपर्काबाहेर होते. त्यानंतर महापौर निवडणुकीच्या वेळी कीर्ती ढोणे उपस्थित राहिल्या, तर उर्वरित तीन नगरसेवक अनुपस्थित राहिले.

या पार्श्वभूमीवर पक्षाने नगरसेवकांचा गट स्थापन करण्याची प्रक्रिया कोकण विभागीय आयुक्त कार्यालय येथे पूर्ण केली. मात्र आयुक्त कार्यालयाने ११ नगरसेवकांची नोंद केली असली तरी संबंधित तीन नगरसेवक कोणत्याही गटात सहभागी नसल्याचे स्पष्ट केले. ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख शरद पाटील यांनी या तिन्ही नगरसेवकांना अंतिम नोटीस बजावत ४८ तासांत खुलासा करण्याचे निर्देश दिले आहेत. गट स्थापनेच्या प्रक्रियेत सहकार्य न केल्याने ही कृती पक्षविरोधी मानली जाऊ शकते, असे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.

पक्षाकडून यापूर्वीही वारंवार स्पष्टीकरण मागण्यात आले होते. मात्र संबंधित नगरसेवकांकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याने आता ही अंतिम नोटीस देण्यात आली आहे. जर दिलेल्या मुदतीत उत्तर मिळाले नाही, तर कोकण विभागीय आयुक्तांकडे नगरसेवकांना अपात्र ठरवण्याची प्रक्रिया सुरू करण्याचा इशारा पक्षाने दिला आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत या प्रकरणात काय निर्णय होणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



## राज्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा

**पुणे, ता. ८ :** मार्च महिन्याला सुरूवात होताच उष्णता वाढू लागली आहे. आतापासूनच उकाडा जाणवू लागला आहे. सूर्य आग ओकण्यास सुरूवात झाली असून विदर्भ तापायला लागला आहे. विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भातील अकोला, अमरावती आणि विदर्भातील तापमान ४० अंशापार गेले आहे. मार्चच्या पहिल्याच आठवड्यात विदर्भातील तापमान चाळीशीपार गेल्यामुळे उष्णतेची लाट आली असे म्हटले जात आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन केले जात आहे. हवामान खात्याकडून आज विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भातील अकोला, अमरावती, वर्धामध्ये तापमान ४० अंशाच्या पार गेले आहे. अकोल्यात राज्यातील सर्वाधिक ४०.८ अंश तापमान झाले आहे. अकोला पाठोपाठ अमरावतीमध्ये ४०.६ तर वर्धा जिल्ह्यात ४० अंश तापमानाची नोंद झाली आहे. पुढील काही दिवसांत राज्याच्या अनेक जिल्ह्यात पारा वाढणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे विदर्भातील नागरिकांनी दुपारच्या वेळी घराबाहेर पडणं टाळावं, असे आवाहन केले जात आहे.

## ट्रम्प यांच्या हत्येच्या कट रचणाऱ्या पाकिस्तानी नागरिकाला अटक

**मुंबई, ता. ८ :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची हत्या करण्याचा कट केल्याबद्दल इराणशी संबंधित असलेल्या पाकिस्तानी नागरिकाला दोषी ठरवण्यात आले आहे. २०२० मध्ये इराणच्या कुडस फोर्सचा कमांडर कासेम सुलेमानीच्या हत्येचा बदला घेण्यासाठी ट्रम्प यांच्यासह अमेरिकेतल्या अन्य राजकीय नेत्यांची हत्या करण्याचा कट या व्यक्तीने केला होता.



आसिफ रझा मर्चंट असे या ४८ वर्षीय पाकिस्तानी नागरिकाचे नाव असून त्याला ब्रुकलिनमधील फेडरल ज्युरींनी शुक्रवारी हत्येसाठी भाडोत्री मारेकऱ्याला सुपारी देणे आणि दहशतवादी कृत्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली दोषी ठरवले आहे. मर्चंट याला आजन्म तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. ट्रम्प यांची हत्या करण्याच्या हेतूनेच मर्चंट अमेरिकेत आला होता, असे यूएस ॲटर्नी जनरल पमेला बोंडी म्हणाल्या.

तोएकइस्लामिकरिव्होल्युशनरी गार्डचा प्रशिक्षित सदस्य असून २०२४ मध्ये रिव्होल्युशनरी गार्डनेच त्याला राजकीय व्यक्तींच्या हत्येची तयारी करण्यासाठी अमेरिकेत पाठवले असल्याचे त्याने कबूल केले असल्याचे अमेरिकेच्या न्याय विभागाने म्हटले आहे. विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, माजी अध्यक्ष ज्यो बायडेन आणि संयुक्त राष्ट्रातील अमेरिकेच्या राजदूत निक्की हेले यांच्यापैकी कोणाला तरी ठार मारायचे होते, असे मर्चंटला सांगितले गेले होते. पण आपले लक्ष्य ट्रम्प हेच असणार होते, असे त्याच्या लक्षात आले होते. त्यानुसार मर्चंट एप्रिल २०२४ मध्ये अमेरिकेत आला. त्याने जूनमध्ये काही मारेकऱ्यांशी संपर्कही साधला. पण हे मारेकरी म्हणजे अमेरिकेतील कायदा रक्षण अधिकारीच होते. त्यांनी जुलै २०२४ मध्ये देशाबाहेर निघून जाण्यापुर्वीच मर्चंटला अटक केली होती.

## मुंख्यमंत्री ममता बॅनर्जीवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंची जाहीर नाराजी

**पुणे, ता. ८ :** देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या त्यांच्या नियोजित आंतरराष्ट्रीय संथाल सम्मेलनात सहभागी झाल्या होत्या. मात्र, राज्य सरकारने या कार्यक्रमाचे ठिकाण बदलले आणि कोणताही मंत्री किंवा वरिष्ठ अधिकारी त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित नव्हते, ज्यामुळे प्रोटोकॉलचे उल्लंघन झाले आहे. पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग येथ आयोजित कार्यक्रमासाठी राष्ट्रपती राज्यात आल्यानंतरही त्यांच्या स्वागतासाठी मुख्यमंत्री ममता बनर्जी किंवा त्यांच्या सरकारकडून कोणीही मंत्री आला नसल्याने हि वागणूक खटकणारी आणि देशाच्या राष्ट्रपतींच अवमान असल्याची भावना आता सर्वस्थरातून व्यक्त केली जात आहे. याबाबत आता स्वत: द्रौपदी मुर्मू यांनी खंत बोलून दाखवली आहे.



कदाचित त्या (ममता बॅनर्जी) माझ्यावर नाराज आहेत, वादाची पार्श्वभूमी आणि घटनाकार्यक्रमाचे ठिकाण बदलणे: मूलतः हे सम्मेलन गोसाईनपूर येथे आयोजित करण्यात आले होते, पण राज्य सरकारने ते बिधाननगर येथे हलवले. राष्ट्रपतींना अतिरिक्त ३० किलोमीटर प्रवास करावा लागला, अव्यवस्था झाली. यामुळे कमी लोक उपस्थित राहिले आणि राष्ट्रपतींनी याबाबत दुःख व्यक्त केले. राष्ट्रपतींच्या पदाला अपेक्षित सन्मान आणि प्रोटोकॉल दिला गेला नाही. याबाबत राष्ट्रपतींनी स्वतः भाषणात उल्लेख केला आणि राज्य सरकारच्या अनुपस्थितीवर प्रश्न उपस्थित केला. तसेच हा कार्यक्रम अशा ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे, जिथे संताल समाजाचे लोक सहज पोहचू शकणार नाहीत, अशी नाराजी राष्ट्रपतींनी बोलून दाखवली.

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रस्तावाला इराणकडून केराची टोपली

**नवी दिल्ली, ता. ८ :** डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला दिलेल्या बिनशर्त शरणागतीच्या इशाऱ्यानंतर इराणच्या नेतृत्वाने ट्रम्प यांचा हा प्रस्ताव केवळ धुडकावून लावला नाही, तर अत्यंत आक्रमक शब्दांत त्याला प्रत्युत्तर दिले आहे. स्वप्न थडग्यात घेऊन जाल, अशा शब्दात राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतर पलटवार केला आहे.



इराणचे राष्ट्राध्यक्ष पेझेश्कियान यांनी देशवासियांना संबोधित करताना ट्रम्प यांच्या मागणीची खिल्ली उडवली. त्यांनी, जे लोक इराणच्या बिनशर्त शरणागतीचे स्वप्न पाहत आहेत, त्यांनी हे लक्षात ठेवावे की ते हे स्वप्न आपल्या थडग्यात घेऊन जातील असे म्हटले. त्यांनी कबूल केले की काही देश मध्यस्थीसाठी प्रयत्न करत आहेत, परंतु अशी कोणतीही चर्चा देशाचा स्वाभिमान आणि सार्वभौमत्व गहाण ठेवून केली जाणार नाही. शेजारी राष्ट्रांबाबत त्यांनी मवाळ भूमिका घेतली असून, ज्या देशांनी इराणवर हल्ला करण्यासाठी आपली जमीन वापरू दिली नाही, त्यांच्यावर इराण हल्ला करणार नाही, असे स्पष्ट केले.

दुसरीकडे, इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांनी ट्रम्प यांच्या जमीन मार्ग हल्ल्याच्या शक्यतेवर कडक भाषेत प्रत्युत्तर दिले. जर अमेरिकन सैन्य इराणच्या भूमीवर उतरणार असेल तर आम्ही त्यांची वाट पाहत आहोत. त्यांच्यासाठी हे मोठे संकट ठरेल, असा इशारा त्यांनी दिला. त्यांनी स्पष्ट केले की इराणची लष्करी शक्ती अशा कोणत्याही आक्रमणाला चोख उत्तर देण्यास समर्थ आहे.



## तेलंगणाचे मुख्यमंत्री रेड्डी यांच्यासमोर १३० माओवाद्यांचे आत्मसमर्पण

**तेलंगणा, ता. ८ :** तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांच्यासमोर १३० माओवाद्यांनी आत्मसर्पण केले. माओवाद्यांची सर्वात घातक तुकडी मानल्या जाणाऱ्या पीएलजीए बटालियन क्रमांक १ सह तेलंगाना स्टेट कमिटी आणि दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीच्या तब्बल १३० माओवाद्यांनी तेलंगणा पोलिसांसमोर आज आत्मसमर्पण केलं.

या १३० माओवाद्यांनी एके ४७, एलएमजी, एसएलआर, इंसास सारख्या १२४ घातक शस्त्रांसह तब्बल ५२०५ जिवंत गोळ्या तसेच अनेक ग्रेनेड आणि यूबीजीएल हे रॉकेट लाँचरसारखे शस्त्र देखील पोलिसांच्या स्वाधीन केले. काही दिवसांपूर्वीच माओवाद्यांचा विद्यमान जनरल सेक्रेटरी देवजीने तेलंगाना पोलिसांसमोर आत्मसर्पण केले होते, त्याच देवजीच्या सुरक्षा तुकडीतील १० माओवाद्यांनी सुद्धा आज तेलंगणा पोलिसांसमोर शस्त्र खाली ठेवले. आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये PLGA बटालियन-१ व बटालियन-२ चे कमांडर एंड्री कलिथराम उर्फ उइकेकल्लू, कोरसा लक्कू तसेच डीके एसझेडसी सदस्य चलसानी नवथा उर्फ चंद्रा यांसारखे वरिष्ठ माओवादी नेतेही आहेत.

माओवादी संघटनेच्या तीन प्रमुख घटकांपैकी PLGA ही महत्त्वाची संघटना होती. मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी हिंसाचाराचा मार्ग सोडून विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचे आवाहन केल्यानंतर अनेक नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करल्याचे तेलंगणा सरकारने म्हटलंय.

# दहावी-बारावीतील कॉपीप्रकरणी राज्यात ८१ कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई

**पुणे, ता. ८ :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावी व दहावीच्या परीक्षांदरम्यान यंदा सीसीटीव्ही यंत्रणेच्या मदतीने मोठ्या प्रमाणात मास कॉपीचे प्रकार उघडकीस आले आहेत. या प्रकरणी राज्यभरातील विविध परीक्षा केंद्रांवरील एकूण ८१ कर्मचारी व शिक्षकांवर निलंबनाची कठोर कारवाई करण्यात आल्याची माहिती मंडळाने परिपत्रकाद्वारे दिली आहे.



बारावीच्या परीक्षेत बीड जिल्ह्यातील चौसाळा येथील कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात (केंद्र क्र. २२४) पहिल्याच पेपरला म्हणजे १० फेब्रुवारी रोजी कॉपीचा प्रकार उघड झाला. या प्रकरणी १७ कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करून निलंबित करण्यात आले. तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय, जैतापूर (केंद्र क्र. ००७९) येथेही सामूहिक कॉपीचा प्रकार सीसीटीव्हीमध्ये स्पष्ट दिसून आला. पर्यवेक्षक व केंद्र संचालक अप्रत्यक्षपणे सहकार्य करत असल्याचे समोर आल्यानंतर २४ जणांवर गुन्हा नोंदवून २१ जणांना निलंबित करण्यात आले.

दरम्यान जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील तीन केंद्रांवर इंग्रजीच्या पेपरमध्ये कॉपी करताना विद्यार्थी पकडले गेले, तर पर्यवेक्षक म्हणून काम करणाऱ्या ५ शिक्षकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. जमुडाफाटा येथील श्री मैनागिरी महाराज कनिष्ठ महाविद्यालयात १६ फेब्रुवारी रोजी भौतिकशास्त्राच्या परीक्षेत ५८१ विद्यार्थ्यांनी सामूहिक कॉपी केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला. या प्रकरणी तीन संस्थांतील सहा शाळांमधील २८ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले.

याशिवाय गडचिरोलीतील ब्रोमनवार विद्यालयात मायक्रोनोट व चॅट जीपीटीचे प्रिंटआउट वापरून कॉपी केल्याचे आढळून आले. या प्रकरणी तीन शिक्षक व एका शिपायावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धाराशिव जिल्ह्यातील सलगरा येथील केंद्रावर रसायनशास्त्राच्या पेपरमध्ये ९ विद्यार्थी गैरमार्गाने परीक्षा देताना पकडले गेले, त्यांच्याकडे मोबाईलही आढळले. या प्रकरणी तीन शिक्षक निलंबित, तर जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

दहावीच्या परीक्षेतही प्रकार समोर आले असून बीड जिल्ह्यातील यशवंत विद्यालयातील केंद्र संचालक असलेल्या मुख्याध्यापकांना निलंबित करण्यात आले. तसेच नांदेड जिल्ह्यातील बेटमोगरा येथे तोतया विद्यार्थी परीक्षा देताना आढळल्याने परीक्षक व केंद्रप्रमुखांवरही निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, सीसीटीव्हीमुळे उघडकीस आलेल्या या घटनांमुळे परीक्षा प्रक्रियेतील गैरप्रकारांवर राज्य मंडळाने कठोर पाऊले उचलण्यास सुरुवात केल्याचे स्पष्ट झाले आहे.